# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६०१२०६
२५६०१२०१
फॅक्स : ०२०-२५६९१३४१

परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७

Website : www.unipune.ac.in
E-mail : coe@unipune.ac.in


## अत्यंत महत्वाचे

संदर्भ : परीक्षा/समन्वय/७६९ दिनांक : ५ जुलै, २०११

प्रति,

१. मा.प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये.
२. मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था.
३. मा.विभागप्रमुख, सर्व विद्यापीठ शैक्षणिक विभाग.

**विषय : ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०११ परीक्षा अर्ज भरण्याबाबत.**

महोदय / महोदया,

ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०११ मध्ये होणा-या विविध परीक्षांची कार्यक्रमपत्रिका आणि परीक्षा केंद्रांची यादी (Schedule of Examinations and List of Centres) विद्यापीठाच्या ***www.unipune.ac.in (Link : Examination - Circulars )*** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

आपणांस विनंती की, विद्यापीठाच्या वरील संकेतस्थळावरुन आपल्या महाविद्यालयात शिकविल्या जाणा-या विद्याशाखांच्या परीक्षांची कार्यक्रमपत्रिकेची प्रत काढून घ्यावी व सूचना फलकावर लावून विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

विद्यापीठ अधिकार मंडळाने, विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार, विद्यापीठाच्या ***www.unipune.ac.in (Link : Examination - Download Exam Form )*** संकेतस्थळावरुन विद्यार्थ्यानी परीक्षा अर्ज डाऊनलोड करून घेऊन, परीक्षा अर्जाच्या किंमतीसह परीक्षा कार्यक्रमपत्रिकेमध्ये नमूद केलेले शुल्क महाविद्यालयात जमा करावयाचे असून, महाविद्यालयाने सर्व विद्यार्थ्यांच्या सर्व शुल्कांचा एकत्रित धनाकर्ष नेहमीच्या पध्दतीने कार्यक्रमपत्रिकेतील तारखेनुसार वेळेत परीक्षा अर्जासह विद्यापीठाकडे जमा करावयाचा आहे. यासंदर्भात परीक्षा अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक ती सर्व मदत/मार्गदर्शन /सहकार्य आपण करीत आहातच.

आपणांस पुनःश्च विनंती करण्यात येते की, सदर पत्राचा आशय सर्व संबंधित शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणून परीक्षा अर्ज वेळेत विद्यापीठाकडे सादर करुन विद्यापीठास नेहमीप्रमाणे सहकार्य करावे. विद्यापीठाच्या सर्व परीक्षांच्या आयोजनाचे काम ही

आपणा सर्वांची वैयक्तिक व सांघिक स्वरूपाची जबाबदारी आहे. या कामी आपण व आपले अध्यापक, अध्यापकेतर सेवक, सहकारी विद्यापीठास नेहमी सहकार्य करीत आलेला आहात व यापुढेही आपण आपले सहकार्य देत राहाल असा विश्वास वाटतो. आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ.शि.मो.आहिरे)
परीक्षा नियंत्रक

**प्रत माहितीसाठी सादर :-**

१. मा.कुलगुरु यांचे कार्यकारी सहाय्यक
२. मा.संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ
३. मा.वित्त व लेखा अधिकारी

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर :-**

१. परीक्षा विभागातील सर्व उपकुलसचिव
२. परीक्षा विभागातील सर्व सहाय्यक कुलसचिव